महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : एमआयएस-०६१५/सी.आर.१३/२०२१/जाहिरात दिनांक:-२६ एप्रिल, २०२४

## -:प्रसिद्धीपत्रक:-

विषय:- महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता आरक्षण अधिनियम २०२४ च्या अंमलबजावणीबाबत.

संदर्भ:- १) महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता आरक्षण अधिनियम २०२४,

२) मा. उच्च न्यायालयाने दि. १६.०४.२०२४ रोजी महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता आरक्षण अधिनियम २०२४ बाबत दिलेले निर्देश.

३) शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्र.संकिर्ण-२०२४/प्र.क्र.७९/आरक्षण-५, दिनांक १९ एप्रिल, २०२४.

शासनाच्या संदर्भ क्रमांक ३ येथील पत्रात नमूद केल्याप्रमाणे हे प्रसिध्दीपत्रक सर्व संबंधित उमेदवारांच्या निदर्शनास आणण्याकरीता जाहीर करण्यात येत आहे.

**२.** महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता आरक्षण अधिनियम २०२४ राज्यात दि. २६.०२.२०२४ पासून लागू करण्यात आलेला आहे. सदर अधिनियमान्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग प्रवर्गासाठी राज्याच्या लोकसेवांमधील शासकीय व निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीच्या पदांमध्ये व शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी १० टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे.

**३.** सदर अधिनियमास मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ३४६८/२०२४ व इतर अन्वये आव्हान देण्यात आलेले आहे. प्रस्तुत न्यायालयीन प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दि. १६.०४.२०२४ रोजी शासकीय व निमशासकीय सेवेतील सरळसेवा भरती व शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाबाबत खालील प्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

"7. In the meantime, having regard to the interim order passed earlier, we provide that if any applications are made pursuant to the advertisement dated 9th February 2024 for admission to undergraduate medicine courses on the basis of [NEET (UG)], 2024 or pursuant to any other such advertisement for making admission to any other educational courses where applicants seek benefit of the impugned enactment, participation of such candidates/applicants shall be subject to further orders which may be passed in these petitions.

8. We also provide that in case any advertisement has been made after promulgation of the impugned enactment for making any recruitment/appointment in public employment in connection with the affairs of the State, other State instrumentalities and State public undertakings/enterprises, the same shall also be subject to further orders which may be passed in these petitions.

9. It is also directed that all such candidates who may participate in any process of selection either for admission to academic/educational courses or for appointment/recruitment in public employment shall be informed of this order by the authority(ies) concerned forthwith."

४. मा. उच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने सर्व संबंधित उमेदवारांना याद्वारे कळविण्यात येते की, संदर्भिय महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता आरक्षण अधिनियम २०२४ मधील तरतुदी नुसार आयोगामार्फत प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या जाहिराती/शुद्धीपत्रक व त्याअनुषंगाने करण्यात येणाऱ्या शिफारशी तसेच नियुक्त्या मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट याचिका क्र. ३४६८/२०२४ व इतर अन्वये दाखल याचिकांवरील मा. न्यायालयाच्या न्याय निर्णयाच्या अधीन राहतील.

ठिकाण:- नवी मुंबई

उप सचिव (जाहिरात)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग